C.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

कार्यालय पोलीस स्टेशन गोरेगांव जि.हिंगोली

1. District (जिल्हा): हिंगोली    P.S. (पोलीस ठाणे): गोरेगांव    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0250    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 11/09/2026 23:19 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शुक्रवार    Date from (दिनांक पासून): 11/09/2026    Date To (दिनांक पर्यंत): 11/09/2026

Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 14:14 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:26 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 11/09/2026    Time (वेळ): 22:47 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 017    Date and Time (दिनांक आणि वेळ): 11/09/2026 22:47 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 02 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): हिंगोली जाणा-या रोडवरील जंगल्य, गोरेगाव ,सेनगाव

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजेश हनमनलु मलपिलु

(b) Father's Name (चे नाव ): हनमनलु मलपिलु

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1984

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगो, हिंगोली , हिंगोली शहर, हिंगोली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगो, हिंगोली , हिंगोली शहर, हिंगोली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8485070037

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल वसंत मैदकर | | वडील चे नाव : वसंत मैदकर | 1. Town/Village (शहर / गाव): शाहु नगर हिंगोली,Tehsil (तहसील): हिंगोली,Police Station (पोलीस ठाणे): हिंगोली शहर,District (जिल्हा): हिंगोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,000/ रू ( ज्यात 500/रू. दराच्या 06 नोटा) | 3,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 3,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

सरकार तर्फे फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली.

दिनांक 11/09/2026

मी,राजेश हनमनलु मलपिलु, वय - 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं.8485070037

सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, जुन 2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे. मी दिनांक 10.09.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार श्री महादेव अशोक मधुरवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय- मजुरी, रा. कडोळी ता. सेनगाव जि. हिंगोली यांनी कार्यालयात येवून तक्रार दिली की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन माझे कुटूंबामध्ये आई -वडील, पत्नी व मुला बाळासह एकत्र परीवारात राहतो व मजुरी करून पोट भरतो.

दि.08.09.2026 रोजी मी आमचे गावी कडोळी येथे हजर असतांना आमचे गावातील अमर संतोष सुर्यवाड यांचेत व आमच्यात जुन्या भांडणाच्या कारणावरून भांडण झाले होते. त्यामुळे त्यांनी माझ्यावर व माझे मामाची मुले गणेश ज्ञानेश्वर कांबळे व राजु सुरेश कांबळे सर्व रा. कडोळी ता.सेनगाव जि.हिंगोली यांचेवर पोलीस ठाणे गोरेगाव ता.सेनगाव जि.हिंगोली येथे पब्लीक एन.सी. दाखल केली असुन त्याचा क्रमांक मला माहित नाही. त्याच भांडणात माझे मामाचा मुलगा गणेश ज्ञानेश्वर कांबळे यांनी गोरेगाव पोलीस ठाणे दिलेल्या तक्रारी वरून 1) अनिल भगवान कांबळे व 2) अमर संतोष सुर्यवाड यांचे विरूध्द पब्लीक एन.सी क्र..104/2026 क.115(2), 352,351(2),3(5) बि.एन.एस.प्रमाणे दाखल केली आहे.

दि.09.09.2026 रोजी आमचे गावचे बिट जमादार पोलीस नाईक मैंदकर, पोलीस ठाणे गोरेगाव यांनी मला फोन करून पोलीस ठाणे गोरेगाव येथे बोलवुन घेतले होते. त्यावरून मी गोरगाव पोलीस स्टेशनला जावुन बिट जमादार मैंदकर यांना भेटलो असता त्यांनी माझेवर व माझे दोन मेव्हुण्यावर दाखल एन.सी.प्रकरणात आजच एस.पी.ऑफिस हिंगोली येथे प्रतिबंधक कारवाई करायची आहे. त्यात तुम्हाला लागलीच जामीन मिळवुन देतो त्याकरीता 4,000/-रू. मला दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे 4,000/-रूपये पैशाची मागणी केली.

तेव्हा मी त्यांना आमच्यासारखीच पुढच्या पार्टीवर सुद्धा कडक प्रतिबंधक कारवाई करा असे म्हणालो असता, बिट जमादार मैदकर यांनी मला होय तुमच्यावरील चॅप्टर केसमध्ये जामीन मिळवुन देतो व पुढच्या पार्टीवर सुद्धा कडक प्रतिबंधक कारवाई करतो त्यासाठीच त्याकरीता 4,000/-रू. मला दयावे लागतील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मला घरी मेव्हुण्यांना बोलावे लागेल आता माझेकडे पैसे नाहीत असे म्हणालो असता बिट जमादार मैदकर यांनी मला ठिक आहे तुम्ही आज चॅप्टर केससाठी जा व नंतर मला भेटून पैसे दया मग मि पुढच्या पार्टीवर सुद्धा कडक प्रतिबंधक कारवाई करतो असे म्हणाले व त्याच दिवशी आम्हाला एस.पी.ऑफीस हिंगोली येथे चॅप्टर केससाठी पाठविले होते व एस.पी.ऑफीस हिंगोली येथे चॅप्टर केसमध्ये आम्ही जमानतदार हजर केल्याने आम्हास जामीनसुद्धा मिळाला आहे.

आमच्यावर दाखल एन.सी.गुन्हयामध्ये चॅप्टर केस वेळी जामीन मिळवुन देण्यासाठी तसेच पुढील पार्टीवर सुद्धा कडक प्रतिबंधक कारवाई करतो म्हणुन बिट जमादार मैदकर यांनी मागीतलेले

पैसे हे लाच असल्याची माझी खात्री झाली असुन त्यांना लाच देण्याची माझी अजिबात ईच्छा नाही. त्यांना लाच म्हणुन देण्यासाठी 4,000/- रू. मी माझे मजुरी कामचे बचतीतुन सोबत आणले आहेत. त्यांचे व माझ्यामध्ये दुष्मणी नाही किंवा कोणतीही अर्थिक देवाण- घेवाणचा व्यवहार नाही. बिट जमादार पोलीस नाईक मैंदकर यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझे कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

सदर तक्रारी वरुन कारवाईचे अनुशंगाने मा. उप विभागीय अधिकारी, सिंचन व्यवस्थापन उप विभाग क्र.03 हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच श्री. दिनेश रावसाहेब धावारे, वय 29 वर्षे, व्यवसाय- नौकरी, स्थापत्य अभियांत्रिकी, सिंचन व्यवस्थापन उपविभाग कार्यालय, हिंगोली, 2) श्री. हनुमान नथुजी फोले, वय 31 वर्षे, व्यवसाय- नौकरी, स्थापत्य अभियांत्रिकी, सिंचन व्यवस्थापन उपविभाग कार्यालय, हिंगोली, गट-क, रा.नरवाडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली. असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.10.09.2026 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी तोंडी सांगीतल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तक्रार व संगणकावर टंकलिखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर आम्ही, दोन्ही पंचानी सहया केल्या.

दि.10.09.2026 रोजी शासकीय पंचा समक्ष तक्रारदार महादेव मधुरवाड यांनी बिट जमादार मैदकर यांचा ठावठिकाणा घेण्यासाठी दोन वेळा फोन केला असता, बिट जमादार मैदकर यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगीतले की, आज पोळा सण आहे मी उदया दि.11.09.2026 रोजी बिट जमादार मैंदकर यांचा ठावठिकाण घेतो. तुम्ही गोरेगाव येथे या, त्यानंतर पुढील कारवाई करावी अशी विनंती केल्याने तक्रारदार यांचे तक्रारीचा सविस्तर तक्रार पंचनामा करण्यात आला आहे.

दि.11.09.2026 रोजी तक्रारदार यांनी फोन करून सांगीतले की, बिट जमादार यांचा ठावठिकाणा घेतला असुन ते गोरेगावला आलेले आहेत. मी गोरेगाव येथे जावून त्यांची भेट घेणार आहे व माझे कामासंबंधाने बोलणी करणार आहे त्यावेळी पुढील कार्यवाही करावी असे सांगीतले वरून लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने पडताळणी पथक व सापळा पथकातील सदस्य, पंच व तक्रारदार यांना थोडक्यात सुचना देवुन लाचमागणी पडताळणी कारवाई गोरेगाव येथे जावुन करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही पडताळणी व सापळा पथकासह शासकीय वाहान क्रमाक एम एच 38 एडी 4337 ने अॅ.सी.बी.कार्यालय, हिंगोली येथुन निघुन गोरगाव ते सवना जाणारे रोडवरील, चैफुलीचे बाजुस असलेल्या शेतामध्ये अंदाजे 14.00 वा. पोहचलो. तक्रारदार यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार तेथे हजर होते. आमच्या सुचनेवरून पोह/फुपाटे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. माझे सुचनेवरून पोह/फुपाटे यांनी व्हॉईस रेकॉर्डर अंदाजे 14.14 वा. सुरू करून तक्रारदार श्री मधुरवाड यांचे अंगातील शर्टच्या आतील बाजुस बनियानला कापडी पिशवीत टाकुन आडकावुन दिला. त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र.1 श्री धावारे यांचे सोबत बीट अंमलदार मैंदकर यांची गोरेगाव येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार

यांच्याकडील मोटर सायकलने रवाना झाले.

त्यानंतर अंदाजे 15.31 वा. तक्रारदार श्री मधुरवाड व पंच क्र.1 श्री धावारे असे मोटर सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोह/फुपाटे यांनी तक्रारदार श्री मधुरवाड यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री मधुरवाड व पंच क्र.1.धावरे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री धावारे यांनी सांगितले की, तक्रारदार व बिट जमादार मैदकर यांची गोरेगाव - पळशी रोडवरील, हाताळा पाटी येथील, इंडियन हॉटेलमधे भेट झाली. त्यावेळी बिट जमादार मैदकर व तक्रारदार यांची तक्रारदार यांचे कामाच्या अनुषगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण बिट जमादार मैदकर यांनी 4,000/-रू. लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 3,000/-रू. लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन लाच रक्कम आजच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे बिट जमादार मैदकर यांची गोरेगाव चैफुली येथे भेट होणार असल्याचे सांगितल्याने बिट जमादार मैदकर यांच्या विरुध्द गोरेगाव चैफुली येथे सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी शासकीय वाहनात सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. पोह श्री. अकबर यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. बिट जमादार मैदकर यांनी तक्रारदार महादेव मधुरवाड यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणुन त्यांचे गळयातील मोठा केशरी रंगाचा रुमाल गळयातुन काढून हातात धरणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर पोह अकबर यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिली.

त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 15.58 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र. 1 धावारे यांच्यासोबत बिट जमादार मैदकर यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार मधुरवाड यांना यांचे मोटार सायकल एम.एच.38 यु 0253 ने गोरेगाव चैफूली येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पोह श्री. फुपाटे, पोह/पवार, पोशी/पुंडगे, पोशी/वाघ, व पंच क्र.2 श्री. फोले असे शासकिय वाहन क्र.एम.एच.38 एडी 4337 ने गोरेगाव चैफुली येथे रवाना झालो. गोरेगाव चैफुली येथे पोहचल्यावर बिट जमादार मैदकर दिसुन आले नसल्याने तक्रारदार यांनी त्यांना फोन करून चैफुली येथे आल्याचे सांगीतले असता, बिट जमादार मैदकर यांनी त्यांना गोरेगाव ते हिंगोली रोडवरील जंगल्या मारूतीकडे जाण-या रोडवर बोलविलेने, तक्रारदार गोरेगाव ते हिंगोली रोडवरील जंगल्या मारूतीकडे जाणा-या रोडवर तक्रारदार व पंच क्रमांक 01 पोहचल्यानंतर सापळा पथकाने थोडया अंतरावर शासकिय वाहन बाजुला उभे करून, तिथे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला. त्यांनंतर तक्रारदार मधुरवाड यांची व बीट जमादार मैंदकर यांची पंच क्र.01 धावारे यांचे समक्ष गोरेगाव ते हिंगोली जाणा-या रोडवरील जंगल्या मारोतीकडे जाणा-या रोडवर भेट झाली. थोडया वेळाने अंदाजे 16.26 वा.चे सुमारास तक्रारदार मधुरवाड यांच्याकडुन बिट जमादार मैदकर यांनी पंचासमक्ष 3000/- रु. लाच रक्कम स्वतः स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांच्या गळयातील मोठा केशरी रंगाचे रुमाल गळयातुन काढून हातात धरून सापळा पथकास ठरविले प्रमाणे

लाच स्विकारल्याचा इशारा केला. त्यावेळी आम्ही, व सोबतच्या सापळा पथकाने बिट जमादार मैदकर यांना ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोह/फुपाटे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन बिट जमादार मैदकर यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव राहुल वसंत मैदकर, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी पोलीस नाईक ब.नं.68, पोलीस ठाणे गोरेगाव, रा. शाहु नगर,हिंगोली असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता पंच क्र.01 धावारे यांनी बीट जमादार मैंदकर यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली अँन्थ्रॉसिन पावडर युक्त 3,000/- रू ( ज्यात 500/-रू. दराच्या 06 नोटा) लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली आहे असे सांगीतले वरून सदरची लाचेची रक्कम पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार श्री. महादेव अशोक मधुरवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.कडोळी ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी दिनांक 10.09.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, दिनांक- 11.09.2026 रोजी करण्यात आलेला पडताळण सापळा पुर्व व सापळा पंचनामा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक राहुल वसंत मैदकर, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी पोलीस नाईक ब.नं.68, पोलीस ठाणे गोरेगाव, रा. शाहु नगर,हिंगोली यांनी तक्रारदार महादेव मधुरवाड यांना त्यांचे विरूध्द दाखल एन.सी.गुन्हयामध्ये चॅप्टर केस वेळी जामीन मिळवुन देण्यासाठी तसेच पुढील पार्टीवर सुद्धा प्रतिबंधक कारवाई करतो म्हणुन 4,000/- रु. लाचेची मागणी करून, तडजोडी अंती 3,000/-रू. लाच रक्कम स्विकारण्यास संम्मती देवुन, आज दिनांक 11.09.2026 रोजी 16.26 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार मधुरवाड यांच्याकडुन गोरेगाव ते हिंगोली जाणा-या जंगल्या मारूती रोडवर 3,000/- रू लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.

तरी राहुल वसंत मैदकर, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी पोलीस नाईक ब.नं.68, पोलीस ठाणे गोरेगाव, रा. शाहु नगर,हिंगोली यांनी तक्रारदार महादेव मधुरवाड यांच्याकडे लाचेची मागणी करून, स्वतः लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(राजेश मलपिलु)

पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.,हिंगोली

13.

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** BALAJI RAMKRISHNA TIPPLWAD **Rank (हुद्दा):** पोलीस निरीक्षक

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** hanumant udhav bhingare

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. गोरेगांव

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1990 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)